राज्यातील महामार्ग सुरक्षा पथके /वाहतूक मदत केंद्रे
यांच्या मनुष्यबळाची पुन:रचना करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,

शासन निर्णय, क्र टिआरए- ०२९५/५२(भाग-3) /पोल ८
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ११ सप्टेंबर १९९६

वाचा :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अ.शा.पत्र.क्र. २५/ब/६१४३/वाहतूक/९५, दिनांक ७.९.१९९५

प्रस्तावना :- राज्यातील महामार्गावरील वाहतूक सुरक्षा यंत्रणेमध्ये सध्या ११ महामार्ग सुरक्षा पथके आणि २५ वाहतूक मदत केंद्रे अस्तित्वात आहेत. यामार्फत महामार्गावरील वाहतूक/सुरक्षा नियंत्रित केली जाते. (सदरहू केंद्राची ठिकाणे विविरणपत्र '' अ'' मध्ये दर्शविलेली आहेत ) या यंत्रणेसाठी ०३ पोलीस उप अधीक्षक व ०५ पोलीस निरीक्षक सध्या राज्यभर क्षेत्रीय पर्यवेक्षणाचे काम करीत आहेत. राज्य पातळीवर विशेष पोलीस महानिरीक्षक हे वाहतूक सुरक्षेचे नियोजन व पर्यवेक्षण करतात आणि शासनाला यथोचित सल्ला देतात.

उपरोक्त यंत्रणा स्थापन करताना सर्वांगिण विचाराची उणीव निदर्शनास आली असून काही भिन्न स्वरूपांच्या यंत्रणा एकाच कार्यक्षेत्रात येऊन सध्याच्या स्वरूपातील यंत्रणा अस्तित्वात आली. यापैकी वाहतूक मदत केंद्रे सन १९८९ पासून अस्तित्वात आहेत. तर महामार्ग सुरक्षा पथके ही १९९२ साली अस्तित्वात आली. यामागील मुख्य पंजाब राज्यातील दहशतवाद्यांकडून महामार्गावरील दरोडे, खून अशा गुन्ह्यांना आळा घालणे, अपघातात जखमींना प्राथमिक सहाय्य व अपघात ग्रस्त वाहने दूर करण्यावरोबरच वाहतुकीतील इतर अडथळे दूर करणे, असा आहे.

या यंत्रणेमध्ये वर नमूद केल्याप्रमाणे वाहतूक मदत केंद्र व महामार्ग सुरक्षा पथक असे दोन स्वतंत्र्य अंशत: समान हेतुचे वेगवेगळे विभाग अस्तित्वात असले तरी त्यांचा आकृतीबंध निरनिराळा होता. अशा भिन्न आकृतीबंधानुसार सर्व ३६ केंद्राचे सध्याचे मनुष्यबळ (घटकनिहाय) आणि इतर पुरक पदांचा तपशिल परिशिष्ट ''ब'' प्रमाणे आहे.

वरील परिस्थितीचा शास्त्रोक्त अभ्यास करून त्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करून वाहतूक सुरक्षा परिणामकारकपणे राबविता यावी म्हणून शासनाने सुसुत्र व नियोजनात्मक वाहतूक सुरक्षा यंत्रणेची पुर्नरचना करण्याचा निर्णय घेतला आहे.

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय :-

सध्या राज्यात ११ महामार्ग सुरक्षा पथके व २५ वाहतूक मदत केंद्रे कार्यरत असून यामध्ये नियोजनबद्ध रितीने सुसूत्रता आणण्यासाठी आणि प्रभावीपणे वाहतूक यंत्रणेत समन्वय साधण्यासाठी या मदत केंद्राचे व सुरक्षा पथकाचे एकत्रीकरण करून आकृतीबंधावर आधारित सध्याची ३६ वाहतूक केंद्रे पुर्नघटीत करण्यात येत आहेत. ही यंत्रणा " महामार्ग पोलीस " या नावाने संबोधिली जाईल. त्याचप्रमाणे मुख्य वाहतूक नियत्रंणाखाली प्रत्येकी एक " सहाय्यता केंद्र " नव्याने निर्माण करण्याचा निर्णय झाल्याने घेतलेला आहे. मुख्य वाहतूक केंद्र आणि सहाय्यता केंद्र हे प्रत्येक पाळीत एका पोलीस उपनिरीक्षकाच्या देखरेखीखाल रहील असे एक मुख्य वाहतूक केंद्र आणि एक सहाय्यता केंद्र यांचा एक घटक समजण्यात येऊन त्याचा आकृतीबंध खालीलप्रमाणे असेल.

मनुष्यबळ :-

| पदनाम | वाहतूक केंद्र | सहाय्यता केंद्र | एकूण |
|---|---|---|---|
| पोलीस उपनिरीक्षक | ३ | - | ३ |
| पोलीस हवालदार | ३ | ३ | ६ |
| पोलीस शिपाई | १८ | ६ | २४ |
| पोलीस शिपाई चालक | ३ | - | ३ |
| | २७ | ९ | ३६ |

साधनसामुग्री :-

| | | | |
|---|---|---|---|
| बिनतारी संच (स्थायी) | १ | १ | २ |
| बिनतारी संच (चलत) | १ | - | १ |
| वॉकीटॉकी संच | १ | १ | २ |
| मारूती जिप्सी | १ | - | १ |
| मोटार सायकल | १ | १ | २ |

वरील आकृतीबंध या यंत्रणेतील कर्मचारी व अधिकारी प्रत्येकी आठ तासांची एक पाळी या प्रमाणे दिवसांच्या तीन पाळयांत कामकाज करतील.

या शासन निर्णयान्वये महामार्ग पोलीस यंत्रणेमध्ये निर्माण करण्यात येणारी रिक्तपदे (विविरणपत्र "क") तसेच सध्या या यंत्रणेमध्ये विविध जिल्हा आस्थापनेवर अस्तित्वात असलेली पदे (विविरणपत्र "ब") यांची सुधारीत आकृतीबंधानुसार जिल्हा निहाय पुनर्रचना दर्शविणारे परिशिष्ठ "ड" सोबत जोडले आहे.

सध्या मंजूर असलेल्या पदांपैकी जी पदे पनर्रचनेमध्ये अनावश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे ती ६४ पदे रद्द करण्यात येत आहेत. या पदांचा जिल्हा निहाय परिशिष्ठ "ई" प्रमाणे आहे.

Scanned with OKEN Scanner

सुधारित आकृतीबंधानुसार पुनर्रचनेनंतर काही जिल्ह्यांच्या आस्थापनांवर विविरणपत्र ''ब'' पैकी काही पदे अतिरीक्त ठरतात व तीच पदे इतर जिल्हा महामार्गावर कमी पडतात. त्यामुळे अशा पदांची अदलाबदल करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदरहू बाबतीत योग्य ते आदेश काढून संबंधीत घटकांना तसेच कोषागार ....... यांना कळविण्याबाबत महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई याना प्राधिकार देण्यात येत आहेत

उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने महामार्ग पोलीस यंत्रणेसाठी खालीलप्रमाणे अतिरीक्त पदे निर्माण करण्यास व साधनसामग्री खरेदी करण्यास शासन मंजूरी देत आहे. या पदांची जिल्हानिहाय वाटप विविरणपत्र ''क'' प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदे | मंजूर संख्या | वेतन कमाल - किमान |
|---|---|---|---|
| १. | पोलीस अधिक्षक | १ | ३०००-४५०० |
| २. | पोलीस उप अधिक्षक | १ | २२००-३७०० |
| ३. | पोलीस निरीक्षक | ३ | २२००-३५०० |
| ४. | पोलीस उप निरीक्षक | ५१ | १६४०-२९०० |
| ५ | पोलीस हवालदार | १८ | १३२०-२०४० |
| ६. | पोलीस शिपाई | ४८३ | ९५०-१४०० |
| ७. | पोलीस शिपाई चालक | ५८ | ९५०-१४०० |
| ८. | मदतनीस तांत्रिक | १२ | ७५०-९४० |
| ९. | वरिष्ठ कार्यालय अधिक्षक (वर्ग २) | १ | २०००-३२०० |
| १०. | प्रमुख लिपीक | १ | १४००-२६०० |
| ११. | उच्च श्रेणी लघुलेखक | २ | २०००-३२०० |
| १२. | वरिष्ठ लिपिक | ६ | १२००-२०४० |
| १३. | कनिष्ठ लिपिक | ८ | ९५०-१५०० |
| | एकुण पदे | ६४५ | |

| अ.क्र | साधनसामुग्री | संख्या |
|---|---|---|
| १. | हिप्पी केंद्रे | ४ |
| २. | रूग्णवाहिका | ५ |
| ३. | मोटार सायकल (१०० सी.सी) | ३७ |
| ४. | ध्वनतारी संच (स्थिर) | ४० |
| ५. | ध्वनतारी संच (चलत) | ९ |
| ६. | वॉकीटॉकी सेट्स | ९९ |

वरील सर्व पदे अस्थायी स्वरूपाची असतील व ती प्रथमत: दिनांक २८.०२.१९९७ पर्यंत चालू राहतील. उपरोक्त साधनसामुग्रीचे वाटप पोलीस महासंचालक हे करतील.

वरील पदांमध्ये एक पद पोलीस अधीक्षकांचे निर्माण केलेले आहे. त्यांचे मुख्यालय मुंबई येथे राहील. पोलीस अधीक्षक हे विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) यांचे स्टाफ ऑफीसर म्हणून राज्य पातळीवरून काम पाहतील

तसेच राज्यपातळीवरून महामार्ग पोलीस यंत्रणेचे दैनंदिन देखभालीच्या सर्व कामकाजाची ...... ..त्यांचेवर राहील. ते विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) यांना थेट .......राहून त्यांना दैनंदिन कामकाजातही सहाय्य करतील.

महामार्ग सुरक्षा गस्त पथके आणि महामार्ग वाहतूक मदत केंद्रावरील उपलब्ध मनुष्यबळाची वरीलप्रमाणे पुनर्रचना प्रायोगिक तत्त्वार केवळ दोन वर्षाच्या कालावधीकरीता करण्याचे शासनाचे आदेश आहेत. त्याचप्रमाणे पुनर्रचनेनंतर वाहतूक व्यवस्थेमध्ये ......बदल साध्य होत आहे. याबद्दलचा त्रैमासिक अहवाल पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास नियमित सादर करणे बंधणकारक राहील.

या प्रस्तावाच्या प्रयोजनार्थ होणाऱ्या आवर्ती रू.११३.२९ लाख व अनावर्ती .....लाख असा एकुण २६५.९४ लाख खर्चाची खालीलप्रमाणे लेखाशिर्ष निहाय तरतुद वित्तीय वर्ष १९९६-९७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात नविन बाब भाग -१ खाली करण्यात केला आहे.

| लेखाशीर्ष | आवर्ती तरतूद | अनावर्ती तरतुद |
|---|---|---|
| २०५५-पोलीस-००१ संचालन व प्रशासन | | |
| ००१ (एक(१)पोलीस निरीक्षणालय वेतन व भत्ते | ०३.२३ | - |
| २०५५-पोलीस-१०९- जिल्हा पोलीस | | |
| १०९ (एक(१) जिल्हा पोलीस बल | ११०.०६ | १५२.६५ |

या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली पदे भरण्यासाठी तसेच साधन सामुग्री खरेदीसाठी लागणारा किमान कालावधी विचारात घेता एकुण अर्थ संकल्पिय तरतुदी इतके अनुदा एकदम .... पडण्याची शक्यता नाही. त्यामुळे मंजूर पदे भरणे व साधन सामुग्री खरेदीसाठी प्राथमिक खर्चापोटी आवर्ती रू. २७.३५ लाख व अनावर्ती रू.७२.६५ लाख असे तुर्त ... एक कोटी इतके अनुदान खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे. उर्वरीत अनुदान आवश्यकेनुसार चालू वित्तीय वर्षातच टप्प्याटप्प्याने मुक्त करण्यात येईल.

प्रस्तावात नमुद केलेली वाहने व बिनतारी यंत्रणा खरेदी करण्यासाठी व त्यासाठी असणारे अनुदान पुणे कोषागारातुन काढण्यासाठी अनुक्रमे पोलीस उप महानिरीक्षक (मोटार परिवहन) महाराष्ट्र राज्य, पुणे आणि संचालक बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर ४७९/९६/व्यय-७, दिनांक ३.६.१९९६ व अर्थोपाय कक्षाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७९३/ए दिनांक ०६.०९.१९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(ना.गो.काकड)
शासनाचे उपसचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner

प्रति,

पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञता) महाराष्ट्र - १, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञता) महाराष्ट्र - २, नागपूर
महालेखापाल (लेखा व परिक्षा) महाराष्ट्र - १, मुंबई
महालेखापाल (लेखा व परिक्षा) महाराष्ट्र - २, नागपूर
संचालक , लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, बिनतारी संदेश , महाराष्ट्र राज्य, पुणे
पोलीस उपमहानिरीक्षक (मोटार परिवहन) महाराष्ट्र राज्य, पुणे
अधिदान व लेखा अधिकारी, लेक्षा कोष भवन , बांद्रा (पुर्व) मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
पोलीस आयुक्त, मुंबई/नागपुर/ठाणे/पुणे/सोलापूर/नाशिक/औरंगाबाद/नवी मुंबई शहर
अपर पोलीस आयुक्त (वाहतूक) मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, ठाणे/कोल्हापूर/नाशिक/अमरावती/नागपूर/औरंगाबाद/नांदेड परिक्षेत्र
पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस दल, पुणे
सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य (लोहमार्ग वगळून)
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१पुणे/गट ८, मुंबई
वित्त विभाग (व्यय ७ व बीयुडी -१०)
कक्ष अधिकारी , गृह विभाग (बीयुडी १)
निवडनस्ती.